**ई–फाईल**

**CNR NO. MHNG**–020018882024

## नियमीत दिवाणी दावा नं. २२९/२०२४ नि.३३ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र. १–अ व १–ब यांनी प्रस्तुत दाव्यात त्यांच्या विरुध्द दि. ३०.०१.२०२६ रोजी झालेला कैफियत नाहीचा आदेश रद्दबातल होण्यासाठी व त्यांना त्यांची कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जावर वादी यांनी त्यांचा खूलासा नि. ३४ वर दाखल केला आहे. प्रस्तूतचा अर्ज त्यावर दाखल खुलासा वाचला. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र. १–अ व १–ब व वादी यांचे विधीज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला.

२. प्रस्तूतच्या अर्जामध्ये प्रतिवादी क्र. १–अ व १–ब यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तुतचा दावा हा वादी यांचे पुराव्यासाठी प्रलंबित आहे. प्रतिवादी क्र. १–अ व १–ब हे आजारी असल्यामुळे ते प्रस्तुत दाव्यात त्यांची कैफियत दाखल करु शकल्या नसल्यामुळे वादातील कैफियत नाहीचा आदेश पारीत करण्यात आला आहे. प्रतिवादी क्र. १–अ ही मयत प्रतिवादी क्र.१ यांची पत्नी असून ती त्यांचे पतीच्या मृत्यूनंतर त्यांचे मुलासह रायपूर येथे राहत असून त्यांची प्रकृती ही योग्य नसल्यामुळे त्यांना त्यांचे वकीलांशी संपर्क करुन त्यांची कैफियत प्रस्तुत दाव्यात दाखल करता आली नाही. प्रतिवादी क्र. १–अ व १–ब यांनी प्रस्तुत दाव्यामध्ये हेतूपुर्वक व जाणीव पुर्वक कैफियत दाखल करण्यासाठी विलंब केलेला नाही. प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी क्र. १–अ व १–ब हे मुख्य प्रतिवादी आहेत. त्यामुळे त्यांना त्यांची कैफियत दाखल करण्यास परवानगी न दिल्यास त्यांचे नुकसान होणार आहे. तसेच, प्रस्तुतचा अर्ज मंजूर झाल्यास वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

३. वादी यांनी प्रस्तुत अर्जास दाखल खुलाश्यामध्ये असे नमुद केले आहे की, प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. १ हे दि. १७.०४.२०२४ रोजी मयत झाले असून त्यानंतर दि. ०७.०५.२०२५ रोजीच्या आदेशाने प्रतिवादी क्र.१ चे वारस म्हणजेच प्रतिवादी क्र. १–अ व १–ब यांना प्रस्तुत दाव्यात सामील करण्यात आले आहे. तसेच, प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. १–अ व १–ब हे दि. ०३.११.२०२५ रोजी हजर झाले आहेत. त्यानंतर त्यांना पुरेसी संधी देवून देखील त्यांनी त्यांची कैफियत दाखल केलेली नाही. प्रस्तुतचा अर्ज हा दि. २९.०७.२०२६ रोजी दाखल करण्यात आला असून तो वादातील कैफियत नाहीचा आदेश झाल्यानंतर साधारण १८० दिवसांनी

दाखल करण्यात आला आहे. प्रस्तुतचा खोटा अर्ज हा केवळ प्रस्तुत दाव्याची सुनावणी लांबणीवर टाकण्याच्या उद्देशाने दाखल करण्यात आला असून त्यामध्ये कैफियत दाखल करण्यास विलंब झाल्याचे योग्य व संयुक्तीक कारण नमुद करण्यात आलेले नसून त्यामध्ये नमुद करण्यात आलेले आजारपणाचे व कौटुंबिक कारण हे योग्य व संयुक्तीक नाही. तसेच, प्रस्तुत अर्जामध्ये नमुद कारणाबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा प्रस्तुत अर्जासोबत दाखल करण्यात आलेला नाही. तसेच, मिनेश अनुप कुमार धाकन व इतर वि. सुरेश इसारदास निचाणी या प्रकरणामध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी ९० दिवसाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर जर योग्य कारण देण्यात असेल तरच कैफियत दाखल करण्यास मुदत देता येईल असे नमुद करण्यात आले आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज हा खर्चासह नामंजूर करण्यात यावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

४. प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. १–अ व १–ब हे दि. ०३.११.२०२५ रोजी हजर झाले आहेत. त्यानंतर प्रस्तुत दाव्यामध्ये दि. ३०.०१.२०२६ रोजी त्यांचे विरुध्द कैफियत नाहीचा आदेश पारीत करण्यात आला आहे. त्यानंतर दि. २३.०२.२०२६ प्रतिवादी क्र. २ व ३ यांचे विरुध्द दावा हा नि. २१ वरील आदेशानुसार खारीज करण्यात आला आहे. त्यानंतर दि. १०.०४.२०२४ रोजी वादी यांनी त्यांचे पुरावा शपथपत्र नि.२७ वर दाखल केले असून ते त्यांचे पडताळणीसाठी प्रलंबित आहे. प्रस्तुतचा अर्ज हा दि. २९.०७.२०२६ रोजी दाखल करण्यात आला आहे. प्रस्तुत अर्जामध्ये प्रतिवादी क्र.१ या आजारी असल्याचे कारण नमुद करण्यात आले आहे. तसेच, प्रस्तुतचा अर्ज हा वादी क्र. १–अ यांच्या सहीने दाखल करण्यात आला आहे. तसेच, प्रस्तुत अर्जासोबत प्रतिवादी यांनी दि. २४.०२.२०२५ रोजीचे डॉ.प्रकाश खंटे यांनी दिलेली औषध उपचाराची यादी दाखल केली आहे. तसेच, प्रस्तुत अर्जासोबत प्रतिवादी क्र. १–अ यांनी त्यांची कैफियत देखील दाखल केली आहे. प्रस्तुतचा दावा हा जाहीरनामा होवून मिळण्यासाठी व निरंतर मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केला आहे. तसेच, प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र. १–अ यांनी विलंबाने दाखल केला असल्याचे दिसून येते. तसेच, प्रतिवादी क्र. १–अ या छत्तीसगड राज्यामध्ये सध्या राहत असल्याचे दिसून येते. तसेच, प्रस्तुत दाव्यात अद्याप वादी तर्फे साक्षीदार क्र.१ यांचा पुढील सरतपास नोंदवण्यात आला नाही. त्यामुळे एकंदरीत प्रस्तुत अर्जामध्ये नमुद कारण विचारात घेता न्यायाच्या दृष्टीने व प्रस्तुत दाव्यातील वादाचे गुणदोषावर अंतिम निराकरण होण्यासाठी दि. ३०.०१.२०२६ रोजी प्रतिवादी क्र. १–अ यांचे विरुध्द कैफियत नाहीचा आदेश

रद्द बातल होणे आवश्यक आहे. तसेच, प्रस्तुतचा अर्ज नामंजूर झाल्यास प्रतिवादी क्र. १–अ यांचे नूकसान होणार आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजुर होण्यास पात्र आहे. त्यामूळे हे न्यायालय खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे –

**आदेश**

| | |
|---|---|
| १. | प्रस्तुतचा अर्ज अशंतः मंजूर करण्यात आला व प्रतिवादी क्र. १–अ यांचे विरुध्द दि. ३०.०१.२०२६ रोजी झालेला कैफियत नाहीचा आदेश रद्द बातल करण्यात येवून प्रतिवादी क्र.१–अ यांना त्यांची कैफियत दाखल करण्यास प्रतिवादी क्र.१–अ यांनी वादी यांना खर्चाची रक्कम रु. २०००/– देण्याच्या अटीवर परवानगी देण्यात आली. |

MAHESH KRISHNA PATIL
Digitally signed by MAHESH KRISHNA PATIL
Date: 2026.08.11 17:04:13 +0530

दिनांकः ११.०८.२०२६

(एम.के. पाटील)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, नागपूर